महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२१/प्र.क्र.०७/प्रनिप्रा/११४ दिनांक : 28 JAN 2021

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी १२:३० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १८ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

१) **डॉ. विश्वजित माने, सदस्य सचिव व महासंचालक,** .... सदस्य
महाराष्ट्र कृषि विषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
**(दुरदृष्य प्रणालीद्वारे)**

२) **श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.),** .... सचिव
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य.

१) डॉ. विलास जी. गायकर, सदस्य तथा माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, सदस्य तथा कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक,३) डॉ. के.डी.चव्हाण, कुलसचिव, सदस्य तथा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ४) डॉ. अभय वाघ, सदस्य तथा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ५) डॉ. धनराज माने, सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. हे सदस्य बैठकीस काही कारणास्तव सहभागी झाले नव्हते, त्यांना तशी परवानगी देण्यात आली.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या **दिनांक २२ जानेवारी, २०२१** रोजीच्या बैठकीचे विषयनिहाय इतिवृत्त खालील प्रमाणे आहे -

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि.१७ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सादर करणे. | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.१७ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या बैठकीच्या ईतिवृत्ताची नोंद घेण्यात आली. |
| २ | (२) मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ९ जुन २०२० रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तानुसार घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाहीचा (Action Taken Report) अहवाल.<br><br>अ) मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी सार पोर्टल संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास दिनांक १९/०९/२०१९ रोजी कायदेशीर नोटीसद्वारे रु. ३८,४१,६४,४६४/- नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे,<br><br>तसेच मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १७/०९/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी सीईटी कक्षास दिनांक ५/०६/२०२० रोजी प्रलंबित देयकासंदर्भात दिलेली नोटीस मागे घेतल्यानंतर त्यांच्या प्रलंबित देयकाबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ९/०६/२०२० रोजीच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे अमॅलबजावणी करण्यात येईल, असे निर्देश आहेत. | मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांनी दिलेल्या कायदेशीर नोटीसला उत्तर देण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांच्या प्रलंबित देयकांसदर्भात प्राधिकरणास प्रस्ताव सादर केला असता, मा. अध्यक्ष महोदय यांनी दिनांक २३/१२/२०२० रोजी आयुक्त स्तरावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. न्यायालयीन गुंतागुत वाढु नये यासाठी मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे यांना देय असलेल्या रक्कमेतून वादग्रस्त असणारी अथवा शासकीय येणे इत्यादी रक्कम रोखून उर्वरित रक्क्म अदा करण्यात आलेली आहे.<br>मे. कल्प टेक्नोलॉजीस यांची कृषी, विधी CAP, सफलता अशी अनेक कामे चालु होती, ती बंद केल्यानंतर त्याची देयके वेळेवर प्रदान न झाल्याने न्यायालयीन वाद निर्माण होण्याची परिस्थिती दिसून येत आहे. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | ब) तांत्रिक समिती गठीत करणेबाबत २० टक्के उर्वरित रक्कम पुरवठादार यांना अदा करण्याबाबत समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश आहेत. | मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी तांत्रिक समिती श्री. पंकज कुमार यांच्या अध्क्षतेखाली, श्री. आशुतोष गुप्ता, आयआयटी, मुंबई सदस्य व श्री. मोईज हुसेन, डी.डी.जी. महाराष्ट्र एमएनके, मुंबई सदस्य समिती गठित करुन समितीची पहिली बैठक Video Conferencing द्वारे दिनांक ३/११/२०२० रोजी झाली आहे. अहवाल अद्याप अप्राप्त आहे. दरम्यान श्री.पंकज कुमार यांनी सदरची तांत्रिक समितीवरील नेमणूक ही पदसिध्द असल्याने ते काम आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी पहावे असे सांगितले. |
| | क) सीईटी कक्षातील श्री. भोसले समितीचा अंतिम अहवाल | सीईटी कक्षा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना मानधन अदा करण्याकरिता श्री. भोसले समितीचा अहवाल दिनांक २९/१२/२०२० रोजी सीईटी कक्षास नुकताच प्राप्त झाला आहे. पुढील छाननी करुन मा.अध्यक्षांचे मान्यतेने प्राधिकरणासमोर यथावकाश सादर करण्यात येईल. |
| | ड) तथापि वरील बाबींचा विचार करता प्रवेश नियामक प्राधिकरणाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार देयके पारित करताना पुरवठादारांनी केलेले काम समाधानकारक पुर्ण केल्याची खात्री करुन तसेच विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन अदा करण्याचे निर्देश आहेत. | प्रवेश नियामक प्राधिकरणाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार देयके पारित करताना पुरवठादारांनी केलेले काम समाधानकारक पुर्ण केल्याची खात्री समन्वयक, आय.टी. विभाग व लेखा विभागाकडून खातरजमा करुनच तसेच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन अदा करण्यात येतात. |
| | (४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एमएचटी-सीईटी ही सामाईक प्रवेश परिक्षा | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील एमएचटी-सीईटी हया ऑनलाईन सामाईक प्रवेश परिक्षे संदर्भात मा. प्राधिकरणाच्या दिनांक १७/०९/२०२० रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ४ मध्ये दिलेल्या सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहेत. |
| | (६) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्युत्तर वैद्यकीय / दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारी संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १७/०९/२०२० रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ६ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सीईटी कक्षाच्या दिनांक १८/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, |



(प्रो पि. बापी)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

| विषय क्र. | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | मुंबई यांना सदर प्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याबाबत विषयसुची क्रमांक ३ मध्ये सविस्तर टिप्पणी सादर केली आहे. |
| | (७) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखालील संबंधीत महाविद्यालयांना माहे नोव्हेंबर २०२० पासून सुनावणी देण्यात आलेली आहे, |

वरीलप्रमाणे प्राधिकरणाच्या निर्णयाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल बैठकीसमोर सादर करण्यात आला. त्यास बैठकीत प्रवेश नियामक प्राधिकरणाने मान्यता दिली.

**विषय क्र. ३ : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पदव्युत्तर वैद्यकिय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

अधिनियम, २०१५ च्या तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रमाणपत्र/कागदपत्रांची ऑनलाईन तपासणी करुन व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाचे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत विद्यार्थी निवड प्रक्रिया करण्यात आली. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी विषयाशी संबंधित खालीलप्रमाणे सविस्तर माहिती बैठकीसमोर सादर केली असता, बैठकीत मुद्देनिहाय निर्णय घेण्यात आले.

अ) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रामधील परिच्छेद क्रमांक ३ (अ) मध्ये नमूद केल्यानुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या मार्फत शासकीय व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाचे अहवाल प्राधिकरणास सादर झालेले नाहीत. शासनाच्या पत्रातील परिच्छेद क्रमांक ३(अ) खालील प्रमाणे आहे,-

*"....... सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून शासकीय महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरीता प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांची पुनश्च: मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही"*

शासनाच्या उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने पदव्युत्तर वैद्यकिय व दंत अभ्यासक्रमाचे प्रवेश शासकीय संस्था वगळुन इतर विनाअनुदानित/शासकीय अनुदानित/महानगरपालिका संचलित संस्थांमधील प्रवेश प्रक्रियेला मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश प्राधिकरणाकडून देण्यात आले.

ब) उक्त अधिनियमातील कलम ९ (५) (एक) मध्ये संबंधित महाविद्यालयाने प्रवेश मान्यतेसाठीचे प्रस्ताव संबंधित संचालकांकडे प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे, अशी तरतुद आहे. पदव्युत्तर वैद्यकीय व दंत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक ३१/०८/२०२० असल्याने पुढील १५ दिवसांत संबंधित संस्थांनी प्रवेश मान्यतेसाठीचे प्रस्ताव संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांच्याकडे सादर केले नसल्याने, संबंधीत महाविद्यालयांनी कायद्यातील कलम ९



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(५) (एक) चे उल्लंघन केल्याचे दिसुन येते. सबब, संबंधित संस्थांना अधिनियम, २०१५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत संबंधित संस्थांनी दहा दिवसात स्वयंस्पष्ट खुलासा सादर करावा, असे प्राधिकरणाकडुन निर्देश देण्यात आले.

**क)** पदव्युत्तर पदवी वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशांबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी सादर केलेला तपासणी अहवाल, प्रवेश नियामक प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने (Random) एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या १० टक्के प्रवेश तपासणी अहवाल व अधिनियम, २०१५ च्या कलम १६ अन्वये प्रक्रिया शुल्क सादर केलेल्या महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल बैठकीसमोर सादर करण्यात आला. या अहवालावर बैठकीत साधकबाधक चर्चा करुन खालीलप्रमाणे प्राधिकरणाने निर्देश दिले आहेत.

१. बैठकीसमोर सादर करण्यात आलेल्या तपासणी अहवालात आढळलेल्या त्रुटींचे **(परिशिष्ट - अ रकाना क्र. ११ नुसार)** निराकरण करण्यासाठी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई व डॉ.प्रवीण शिंगारे, माजी संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांची समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या समितीने संबंधीतांना सुनावणी देऊन त्रुटींचे निराकरण करुन त्याचा अहवाल १५ दिवसांमध्ये प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याचे बैठकीत निर्देश देण्यात आले.

२. पदव्युत्तर पदवी वैद्यकीय व दंत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित / शासकीय अनुदानित / महानगरपालिका संचलित ज्या संस्थांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रक्रिया शुल्काचा पूर्ण भरणा केलेला नाही. अशा संस्थांनी दि.२५ जानेवारी, २०२१ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत भरणा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत **(परिशिष्ट - ब)**.

३. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या पदव्युत्तर पदवी वैद्यकीय व दंत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या एकूण १२ तक्रारीबाबत मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर सर्व संबंधितांना सुनावणी देऊन प्रकरणे निकाली काढावी. **(परिशिष्ट - क)**.

४. **परिशिष्ट - अ मध्ये रकाना क्र. ९** मध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना पूर्ण प्रक्रिया शुल्क भरणा करणे, विलंब शुल्काचा भरणा करणे या अटींच्या अधीन राहून प्राधिकरणाची तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे. **(परिशिष्ट - क वगळुन)**

५. ज्या महाविद्यालयांनी अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतुदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्याकडून तपासून प्राधिकरणासमोर सादर केलेले नाहीत **(परिशिष्ट - ड)**, अशा महाविद्यालयातील प्रवेशांना प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात आली नाही.

**विषय क्र.४ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे माहे, डिसेंबर २०२० पर्यंतचे अद्यावत लेखा बाबतची माहिती (माहितीस्तव).**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे माहे एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० पर्यंतचे सादर करण्यात आलेले अद्यावत लेख्यांची नोंद घेण्यात आली.



(प्रो.पी.डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्र.५ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष या दोन्ही विभागाकरिता विविध सेवा करिता नियुक्त करण्यात आलेल्या सेवापुरवठादार यांच्याशी केलेल्या सामज्यंस करार संबंधीची माहिती प्राधिकरणास अवगत करणे (माहितीस्तव).**

**आणि**

**विषय क्र.६ : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत घेण्यात आलेल्या येणाऱ्या सामाईक प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती प्राधिकरणास अवगत करणे (माहितीस्तव).**

आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सर्व अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिये संबंधित विस्तृतपणे माहिती सादर केली. तसेच, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष या दोन्ही विभागाकरिता विविध सेंवा करिता नियुक्त करण्यात आलेल्या सेवापुरवठादार यांच्याशी केलेल्या सामंज्यस करारासंबंधी माहितीची प्राधिकरणाने बैठकीत नोंद घेतली.

**विषय क्र.७ : अधिनियम २०१५ अस्तित्वात आल्यापासून ते आजतागायत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाकडून राबविण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परिक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत सर्व नियम, नियमावली, अधिसूचना, शासन निर्णय तसेच न्यायालयीन आदेशाच्या प्रती शैक्षणिक वर्ष निहाय प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांच्या दैनंदिन कामकाजाचे नियमन करण्यासाठी दिनांक २५/१०/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले होते,

> *" Wherever as per Act, Government rules/ instructions received by authority, the Secretary should study and put up the papers for necessary action to Authority. For framing regulations by Authority regarding various subjects as per law regarding administrations, accounts, functions, powers etc. this information should be called from corresponding Authorities in the State as well as Other States. For this purpose visits should be arranged to these Authorities, if necessary, as early as possible."*

त्या अनुषंगाने इतर राज्यातील CET/ARA शी संपर्क करण्यात आला असुन माहिती उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी बैठकीत माहिती दिली. याबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.८ : मा.अध्यक्ष , प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयावर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी कक्षातर्फे घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रकियांसंदर्भात बैठकीसमोर माहिती दिली. या प्रक्रियांदरम्यान विविध स्तरावर विद्यार्थी, पालक, संस्था यांना प्रक्रियांबाबतचे वेळापत्रक/इतर माहिती तसेच शासनास माहिती



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उपलब्ध करुन देणे यासाठी कार्यालयात जनसंपर्क अधिकाऱ्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा करुन, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.मावज २०१६/७०४/प्र.क्र.१८६/३४-अ, दि.०८/०२/२०१८ व शासन निर्णय क्र.मावज २०१८/प्र.क्र.१४५/३४-अ, दि.२७/०८/२०१८ मधील तरतुदींनुसार एका जनसंपर्क अधिकारी पदाची पदनिर्मिती, पदनिवड व नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

२. अधिनियम, २०१५ अस्तित्वात येण्यापुर्वी व अस्तित्वात आल्या नंतर संचालक स्तरावर घेण्यात येत असलेलया सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियांदरम्यान झालेल्या जमाखर्चाचा हिशोब लवकारात लवकर संबंधित संचालकांच्या मदतीने पूर्ण करण्यात यावा, असे प्राधिकरणाने निर्देश दिले. पुढील बैठकित शक्यतो सादर करण्यात यावे.

वरीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा झाली. प्रवेश प्रक्रियेच्या कार्यक्रमाच्या संदर्भात आपली मते सदस्यांनी मांडावी असे मा. अध्यक्ष, यांनी सुचित केले असता प्राधिकरणाच्या सर्व मान्यवर सदस्यांनी कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या लॉकडाऊन कठीण परिस्थितीत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाने शै. वर्ष २०२०-२१ वर्षाच्या पदव्युत्तर वैद्यकीय व दंत प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम राबविला, तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा व प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी परिस्थितीनुसार करत असलेली कार्यवाही प्रशंसनिय व कौतुकास्पद असल्याचे नमूद करुन राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षास धन्यवाद दिले. तसेच, प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाने प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांची पडताळणी करणे व इतर प्रक्रिया राबविण्यासाठी परिस्थितीनुसार केलेली कार्यवाही प्रशंसनिय व कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

२१/१/२१

(जे. पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

दिनांक - २१/०१/२०२१